**" अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेवरील हरकतींची दि.१२-९-२०१८ रोजी सुनावणी "**

अ.नगर दि.११ - अहमदनगर महानगरपालिकेच्या निवडणूकीकरिता प्रभाग रचनेवर नागरीकांनी नोंदविलेल्या हरकतींची सुनावणी शासकीय विश्रामगृह येथील हॉल, नगर-औरंगाबाद रोड, अहमदनगर याठिकाणी दि.१२-९-२०१८ रोजी सकाळी १० पासून पुढे श्री.राजीवकुमार मित्तल, सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेसमोर घेण्यात येणार आहे.

सुनावणीस गैरहजर राहिल्यास त्यानंतर हरकतदारास सुनावणी देण्यात येणार नाही. तसेच प्रतिनिधीस सुनावणी दिली जाणार नाही. एका वेळी एकाच हरकतदारास सुनावणी देण्यात येईल. ज्या हरकतीवर एकपेक्षा जास्त व्यक्तींच्या स्वाक्ष-या असतील तेथे फक्त दोनच व्यक्तींना सुनावणी देण्यात येईल. तरी ज्या हरकतदारांनी हरकती नोंदविल्या आहेत त्यांनी सुनावणीसाठी स्वत: उपस्थित रहावे, असे मनपाने दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हंटले आहे.

---*---

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.प्रसिध्दी विभाग - ११९
दिनांक : ११-९-२०१८

M.M. [signature]
प्र.प्रसिध्दी अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.